शनिवारीच साजरे करता येईल रक्षाबंधन-पंचांगकर्ते बोरकर गुरूजी

रावेर । प्रतिनिधी

यंदा रक्षाबंधन व नारळी पौर्णिमेच्या तारखांबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. कारण श्रावण पौर्णिमा यावर्षी दोन दिवस दि.८ व ९ ऑगस्ट या दोन्ही दिवशी आहे. शास्त्रानुसार रक्षाबंधनासाठी पौर्णिमा असणे अत्यावश्यक असल्याने योग्य दिवस कोणता हा प्रश्न अनेकांना पडला आहे. दि.८ ऑगस्ट, शुक्रवार रोजी भद्रा दुपारी १४ वाजून १२ मिनिटांनी सुरू होऊन शनिवारी दु १.५१ मिनिटांपर्यंत राहते. तसेच शुक्रवारीच पौर्णिमेची सुरुवातही दुपारी १४:१२ पासून होते. मात्र, ही पौर्णिमा सूर्योदयकालीन नसल्यामुळे रक्षाबंधनासाठी शुद्ध मानली जात नाही. तरीसुद्धा नारळी पौर्णिमा ही संध्याकाळी केली जाते व यंदाची भद्रा पाताळलोकी असल्याने नारळी पौर्णिमेसाठी हा दिवस शुभ आहे. शुक्रवार हा जलवार असल्याने,नारळी पौर्णिमा शास्त्रानुसार ८ ऑगस्ट रोजीच करावी.रक्षाबंधनासाठी सूर्योदयकालीन पौर्णिमा आवश्यक असते. त्यासाठी यंदा दि.९ ऑगस्ट, शनिवार रोजी आहे. हा दिवस पुत्रवार, बंधुवार तसेच यम यांचा दिवस आहे. पौर्णिमा सूर्योदयाला सुरू असून दुपारी १ वाजून २४ मिनिटांपर्यंत टिकते. या दिवशी अथर्व-तैत्तिरीय श्रावणी, सौभाग्य योग आणि विशेषतः अश्वत्थ मारुती पूजन असेही योग आहेत. त्यामुळे रक्षाबंधनाचा विधी सकाळी सूर्योदय ६:१९ नंतर ते दुपारी १ :२५ पर्यंतच करावा. त्यानंतर प्रतिपदा सुरू होऊन प्रतिपदा श्राद्धाचा प्रारंभ होतो. तेव्हा रक्षाबंधन करता येणार नाही. त्यामुळे यंदा नारळी पौर्णिमा शुक्रवार, ८ ऑगस्ट रोजी आणि रक्षाबंधन शनिवार, ९ ऑगस्ट रोजी दुपारी १:२५ पर्यंत करणे शास्त्रसंमत असल्याचे रावेर येथील विश्वज्योतिषाचार्य व पंचांगकर्ते बोरकर गुरुजी यांनी सांगितले आहे.

तालुक्यातील शीव रस्त्याच्या दुतर्फा ४३३२ वृक्षांची लागवड

चाळीसगाव । प्रतिनिधी

महसुल सप्ताह २०२५ अंतर्गत चाळीसगाव तहसील कार्यालयातर्फे विविध लोकाभिमुख कार्यक्रम राबविले जात आहे. गतकाळात मोकळ्या करण्यात आलेल्या शीव पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा एकूण ४३३२ वृक्ष लागवड करुन हरित शिवरस्ता करण्याचा संकल्प महसुल प्रशासनाने केलेला आहे. चाळीसगाव महसुल विभागाने सर्व ०९ मंडळात हा उपक्रम राबविला आहे. तालुक्यात तब्बल १२ शिवरस्ते अतिक्रमण काढुन मोकळे करण्यात आलेले आहेत.या सर्व रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष ३ लागवड करुन त्यांच्या संगोपन व संवर्धनाची जबाबदारी ही लगतच्या शेतकऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. भविष्यात याचा लाभ संबंधित शेतकऱ्यांनाच होणार आहे. तसेच मालेगाव रोडवर, जुन्या पाणी टाकीजवळ, नगरपालिकेच्या बागेत कडुनींबाची १६ झाडे लावण्यात आली. यावेळीप्रमोद हिले, उपविभागीय अधिकारी चाळीसगाव, तहसीलदार, प्रशांत पाटील, मुख्याधिकारी सौरभ जोशी, निवासी नायब तहसीलदार प्रथमेश मोहोड व मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते.

चाळीसगाव येथे १२ महाविद्यालयातील २४ युवक-युवतीं झाले महसुल दूत

चाळीसगाव । प्रतिनिधी

विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम सो यांनी दिनांक ३० जुलै २०२५ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार महसूल विभागाच्या योजनांविषयी चाळीसगाव तालुक्यात लोकजागृती करण्याच्या उद्देशाने १२ महाविद्यालयातील एकूण २४ युवक - युवतींची महसुल दुत म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्वांना दि.४ रोजी तहसिलदार चाळीसगाव यांच्या दालनात प्रशिक्षण देण्यात आले. मा.प्रमोद हिले,उपविभागीय अधिकारी चाळीसगाव यांनी सर्व महसूल दुतांना त्यांच्या नियुक्तीचा उद्देश समजावून सांगितला. तहसीलदार प्रशांत पाटील यांनी महसुल विभागांतर्गत येणा-या विविध योजना व सेवा यांची सविस्तर माहिती दिली. चाळीसगाव तालुक्यातील गरजू, पात्र लाभार्थी शासनाच्या विविध योजनांपासून वंचित राहू नयेत तसेच ई पीक पाहणी, ई हक्क प्रणाली यांचा शेतकऱ्यांनी प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने आवश्यक लोकजागृती करण्याकरीता सर्वांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करावा अशा सूचना दिल्या. नियुक्त केलेल्या सर्व महसुल दुतांना विहित नमुन्यातील ओळखपत्र देण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणासाठी निवासी नायब तहसिलदार प्रथमेश मोहोड, महसूल नायब तहसीलदार डॉ.संदेश निकुंभ आदि उपस्थित होते.

योध्दा शिक्षक पुस्तकाचे ज्येष्ठ नेते खा.शरद पवार यांच्याहस्ते मुंबईत प्रकाशन

चोपडा । प्रतिनिधी

घोडगाव येथील रहिवाशी तथा चोपडा येथील दादासाहेब डॉ. सुरेश जी.पाटील महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्रा.प्रदीप पाटील यांच्या जीवनावरील योद्धा शिक्षक पुस्तक त्यांचे विद्यार्थी चेतन बाविस्कर यांनी संपादीत केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरद पवार यांच्याहस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचे निवासस्थानी सिल्वर ओक,मुंबई येथे नुकतेच करण्यात आले. योद्धा शिक्षक पुस्तकात प्रा.प्रदीप पाटील यांच्या शालेय जीवनापासून ते सेवानिवृत्त होई पर्यंतची वाटचाल शब्दबद्ध करण्यात आली असून त्यात प्रा.पाटील यांच्या सहवासातील काही महनीय व्यक्तींची मते नोंदविण्यात आली आहेत.पुस्तक प्रकाशन प्रसंगी प्रा.प्रदीप पाटील, रामकृष्ण शिरसाठ,संजय कोळी,जितेंद्र शिरसाठ, अविनाश पाटील आदी उपस्थित होते.

निम्न तापी प्रकल्पामधील बाधित दुसऱ्या टप्प्यातील गावांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा- आ.अनिल पाटील

मंत्रालयात तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत मिळाली मान्यता

अमळनेर । प्रतिनिधी

निम्न तापी प्रकल्पाच्या टप्पा एक सोबतच टप्पा दोन मधील बाधित सर्व गावांच्या पुनर्वसनाचाही मार्गही आता मोकळा झाला असून दि.५ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मंत्रालयात झालेल्या तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत सदर मान्यता मिळाल्याची माहिती माजी मंत्री तथा आ.अनिल पाटील यांनी दिली.

सदर पुनर्वसनात अमळनेर तालुक्यातील बोहरे, कलाली, प्र.डांगरी व सात्री या चार गावांचा समावेश झाला आहे. या बैठकीत इतर महत्वपूर्ण महत्वपूर्ण मान्यता देखील मिळाल्याने सदर बैठकीत अनेक कामांचे मार्ग खुले झाल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

दरम्यान काल दि.५ रोजी तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची बैठक मंत्रालयात जलसंपदा मंत्री नामदार गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी अमळनेर तालुक्याचे आमदार तथा माजी मंत्री अनिल पाटील हे उपस्थित होते.याशिवाय सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीत निम्न तापी प्रकल्पाच्या टप्पा एक सोबतच टप्पा दोन मध्ये बाधित होणाऱ्या सर्वच गावांचे पुनर्वसन करावे असा आग्रह आमदार पाटील यांनी बैठकीत धरला कारण जी गावे अंशतः किंवा ५० टक्के बाधित ठरत असतील त्यांचेही पुनर्वसन भविष्यात करावेच लागणार असल्याने आताच हा निर्णय घ्यावा अशी आग्रही मागणी त्यांनी केली यामुळे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील गावांचे पुनर्वसन सोबतच हाती घेण्यास तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळात मान्यता देण्यात आली. यामुळे आता अमळनेर तालुक्यातील प्र. डांगरी, कलाली, बोहरा, सात्री तसेच चोपडा तालुक्यातील विटनेर, बुधगाव, नांदेड नांथे, घाडवेल, अनवरदे खुर्द, होळ व अजंदे खुर्द याही गावांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला. विषेश म्हणजे यामुळे बोहरे ग्रामस्थांना न्याय मिळाला आहे.

शेतीसाठी बंद नलिका पाणी वितरण प्रणालीस मान्यता- याच बैठकीत निम्न तापी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील उर्वरित १७,९४३ हेक्टर क्षेत्रास बंद नलिका वितरण प्रणाली द्वारे पाणी मिळण्यासाठी आवश्यक सर्वेक्षण व संकल्पन करण्यास मान्यता प्राप्त झाली.

सात्री येथील भूखंड वाटप व जमीन संपादनाचा प्रश्न सुटला- अमळनेर तालुक्यातील मौजे सात्री येथील अतिरिक्त ३३ कुटुंबांना भूखंड वाटप करण्यास तसेच सध्याच्या अस्तित्वातील रिकाम्या जागांपैकी भूखंड देण्यास व अतिरिक्त १.१३ जमीन संपादित करण्यास या बैठकीत परवानगी प्राप्त झाली.

इतर महत्वपूर्ण झालेत निर्णय- अमळनेर नगरपालिकेच्या नवीन २४ बाय ७ पाणीपुरवठा योजनेसाठी जलसंपदा विभागाची ०.३९ हेक्टर जमीन वलती करण्यास या बैठकीत परवानगी मिळाली तसेच माळण नदी- पांझरा जोड कालवा योजनेसाठी पाणी उपलब्धता बाबत कार्यवाही करण्याचे आदेश सदर बैठकीत देण्यात आले.

बाधित गावांच्या पुनर्वसनासह इतर प्रश्नांसाठी आमदार अनिल पाटील यांचा शासन दरबारी सतत पाठपुरावा सुरू होता त्यांच्या प्रयत्नांना यश आल्याने आमदार पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मुक्ताईनगर मतदार संघातील रखडलेले विकास कामे मार्गी लागणार-आ.चंद्रकांत पाटील

मुक्ताईनगर । प्रतिनिधी

मुक्ताईनगर मतदारसंघातील रखडलेल्या पुनर्वसन तसेच विविध अडचणी सोडविण्यासाठी राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे मुंबई येथील दालनात दि.६ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी दुपारी चार वाजता महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

याप्रसंगी मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाचे आ.चंद्रकांत पाटील, अप्पर मुख्य सचिव मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई, अप्पर मुख्य सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त नाशिक, जिल्हाधिकारी जळगाव व पुनर्वसन तसेच जलसंपदा विभागाचे संबंधित सर्व अधिकारी यांची उपस्थिती होती. तर काही गैरहजर अधिकाऱ्यांच्या बाबतीत बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच बैठकीला संबंधित पुनर्वासन गावांचे प्रतिनिधी स्वरूपात सरपंच व प्रमुख मान्यवर मंडळी उपस्थित होते.

मुक्ताईनगर मतदार संघातील हतनूर प्रकल्प पुनर्वसन अंतर्गत मुक्ताईनगर शहरातील पुनर्वसनाच्या टप्पा क्र. ३ मध्ये २२ प्रकल्पग्रस्ताना भूखंड मिळालेला नाही. तसेच मागील काळात मुक्ताईनगर पुनर्वसन टप्पा क्र.४ मध्ये बाधित ४१३ परे, मौजे वाघाडी, मौजे ऐनपूर, मौजे नेहेते, मौजे भामलवाडी ता.रावेर येथील हतनूर जलाशयाच्या बॅक वाटरमुळे अप्रत्यक्षरीत्या बाधित होत असल्याने संपादन करावयाच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता मिळाल्याने प्रस्ताव शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागास पाठविणेबाबत व प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व निधी मिळणे बाबत जिल्हाधिकारी, कार्यालय जळगाव यांचेकडील दि.१४ जून २०२४ अन्वये मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेमार्फत शासनास सादर करण्यात आला आहे. त्यातच मौने अंतुली, मौजे धामणदे, पिंप्रीनांदू, बेलसवाडी ता.मुक्ताईनगर व मौजे कांडवेल ता.रावेर येथील मागील काळात झालेल्या पुनर्वसनातील वर नमूद गावांमधील नागरिक हे नागरी सुविधांपासून वंचित असून सोयी सुविधा अपूर्ण असून अशा विविध अडचणी व समस्यांसंदर्भात आमदार चंद्रकांत पाटील यांच्या मागणीनुसार आज मदत व पुनर्वसनमंत्र्यांच्या दालनामध्ये बैठक पार पडली.

मदत व पुनर्वसन श्री स्वामी मंत्र्यांनी सदरील रखडलेल्या पुनर्वसन व विविध अडचणी जाणून घेत या संदर्भात सकारात्मक असल्याचे सांगत लवकरच याबाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मदत व पुनर्वसन मंत्री आणि जलसंपदा मंत्री यांची विशेष बैठकीचे आयोजन करून संबंधित बहु प्रतिक्षेत असलेल्या पुनर्वसन पीडितांना न्याय देणार असल्याची आश्वासन मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले.

सदर बैठकीत १.मुक्ताईनगर पुनर्वसन टप्पा क्र.४ मध्ये बाधित ४१३, वाघाडी, ऐनपूर, नेहेते, मौजे भामलवाडी ता. रावेर येथील हतनूर जलाशयाच्या पक्षजलामुळे अप्रत्यक्षरीत्या बाधित होत असल्याने संपादन करावयाच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता मिळाल्याने प्रस्ताव शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागास पाठविणे बाबत व प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व निधी मिळणे बाबत जिल्हाधिकारी, कार्यालय जळगाव यांचेकडील दि.१४ जून २०२४ अन्वये मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे मार्फत शासनास सादर करण्यात आला आहे.

२. टप्पा क्र.०३ मधे २२ प्रकल्पग्रस्तांना भुखंड वाटप झाले नसल्याबाबत मा.आमदार चंद्रकांत पाटील, मुक्ताईनगर यांनी तक्रारी केल्या आहेत. यांचे मार्फत प्राप्त तक्रारी व अर्जाची कार्यकारी अभियंता, जळगाव मध्यम प्रकल्प विभाग क्र.०१ व तहसीलदार मुक्ताईनगर यांचे मार्फत चौकशी करून शासन निर्णय नुसार भुखंड वाटपाबाबत कार्यवाही करणेची तजवीज ठेवली आहे.

३.मौजे अंतुर्ली, भौजे पिंप्रीनांदू बेलसवाडी ता मुक्ताईनगर व मौजे कांडवेल ता. रावेर येथील मागील काळात झालेल्या पुनर्वसनातील वर नमूद गावांमधील नागरिक हे नागरी सुविधां पासून वंचित असून सोयी सुविधा अपूर्ण असून माझ्या मतदार संघातील वर नमूद व अजून काही गावांमधील नव्याने पुनर्वसन करणे आवश्यक आहे. ४. सुलवाडी ता.रावेर हे गाव हतनूर बॅक वाटर कराड वर वसलेले असून , हे गाव सर्वात आधी पुनर्वसन होणे गरजेचे असताना अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणा व दुर्लक्षामुळे अद्यापापावेतो झालेले नाही. त्यामुळे एखाद मोठी दुर्घटना होण्याची शासन वाट पाहतेय का? असा सवाल आ.चंद्रकांत पाटील यांनी केला. यावर मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सदरील सुलवाडी गावाचा पुनर्वसनाचा नव्याने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केल्या.

शेतकऱ्यांसाठी 'स्मार्टप' विकसित करण्यासाठी बैठक

न्हावी,ता.यावल। वार्ताहर

शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा आणि व्यवस्थापनासाठी स्मार्ट प विकसित करण्याचा उपक्रम राबवण्यात येत आहे. या पद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसंदर्भातील अडचणींवर उपाय, वेळेवर माहिती व सल्ला मिळावा, त्यांचे उत्पन्न वाढावे आणि शेती अधिक सुसंगत व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून येथील जे.टी. एम. फ्रूटसेल सहकारी सोसायटी सभागृहात शेतकऱ्यांची बैठक पार पडली.

या प्रस्तावित पमध्ये जिओ टॅगिंग, सॅटेलाईट इमेजिंग, आय ओटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स या तंत्रज्ञानांचा वापर करून शेतजमिनीची ई-बाऊंड्री निश्चित केली जाणार आहे. शेतामध्ये कुठलीही घुसखोरी किंवा चोरी झाली तर त्या घटनेची सूचना थेट शेतकऱ्याच्या मोबाईलवर मिळणार असून, त्याच वेळी जवळच्या पोलिस चौकीला सुद्धा अलार्मद्वारे माहिती पोहोचवली जाईल.

शेतजमिनीचा पोत आणि आर्द्रतेनुसार योग्य पाणी व खत यांचे मार्गदर्शन, हवामानाच्या आधारे सावधगिरी सूचना, पिकांवरील किडींचे निदान व प्रतिबंधक उपाय, तसेच शेतकऱ्यांना अधिकृत माहिती स्वरूपात या पमधून उपलब्ध होणार आहे. या बैठकीत जे टी महाजन फ्रुटसेल सहकारी सोसायटीचे चेअरमन शरद महाजन, महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाचे अध्यक्ष अरुण बोरोले, तसेच प्रकाश वराडे, दिलीप चौधरी आणि कृष्णाजी खडसे यांचे मार्गदर्शन लाभले. उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्या अनुभवातून अनेक महत्त्वाच्या समस्या मांडल्या. शेतातील डी. पी. किंवा. ट्रान्सफॉर्मरवरील चोरी, किटकनाशकांच्या अतिशय वाढलेल्या किंमती, किड येण्याआधी उपाययोजना, जमिनीच्या पोतानुसार योग्य खतांची निवड, हवामानानुसार सावधगिरी सूचना, बाजार समित्यांचे दररोजचे बाजारभाव, पिकांचे ग्रेडिंग निकष,शेतीसाठी उपयुक्त उपकरणांची माहिती आणि उपलब्धता,तसेच शेतमाल खरेदी-विक्री व निर्यातीसाठी डीलर्सची माहिती यांचा समावेश या पमध्ये असावा, अशी शेतकऱ्यांची स्पष्ट मांडणी होती.सदर पच्या विकासासाठी सीईओपी पुणेचे कुलगुरू सुनिल भिरूड,पिंपरी-चिंचवड विद्यापीठाचे उपसंचालक निळकंठ चोपडे आणि पीआयसीटी पुण्याचे प्रा. संदीप वऱ्हाडे यांचे तांत्रिक सहकार्य लाभणार आहे. हा प शेती क्षेत्रात डिजिटल आणि सशक्त व्यवस्थापनाची नवी दिशा देणारा ठरेल असा विश्वास या बैठकीतून व्यक्त करण्यात आला.

पारोळा येथे लाच लुचपत कारवाई प्रकरणी तिघांना दोन दिवस पोलिस कोठडी

पारोळा । प्रतिनिधी

बांबू लागवडीच्या फाईलला मंजुरी देण्यासाठी ३६ हजारांची लाच मागत ती खासगी पंटर व क्लार्कच्या माध्यमातून स्वीकारताना सामाजिक वनीकरण विभागाचा अधिकारी मनोज बबन कापूरे सह दोन जणांना एसीबीने मंगळवारी दुपारी चार वाजता अटक केली होती त्यांना न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याबाबत मनोज बबनराव कापूरे, वय- ५४ वर्ष, व्यवसाय-नोकरी, वन परिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण, पारोळा, अतिरिक्त कार्यभार-सामाजिक वनीकरण, अमळनेर.(वर्ग-२) निलेश मोतीलाल चांदणे, वय ४५ व्यवसाय- नोकरी, लिपीक वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, पारोळा. (वर्ग ३) कैलास भरत पाटील, वय २७ वर्षे, व्यवसाय, कंत्राटी कर्मचारी रा.मोरफळ ता.पारोळा (कंत्राटी कर्मचारी चालक) यांनी बांबू लागवडीच्या फाईल मंजुरीसाठी तडजोड अंती ३६,००० घेतले होते. त्या तिघांना न्यायालयात हजर करून दोन दिवसाची पोलिस कस्टडी सुनावण्यात आल्याचे लाच लुचपत प्रतिबंधक उपाध्यक्ष योगेश ठाकूर यांनी सांगितले.

हरिनाम सप्ताह अध्यक्षपदी समाधान चौधरी

कासोदा । वि. प्र.- कासोदा पंचक्रोशीतील व कासोदा गावातील सर्वात मोठा उत्सव म्हणजे श्री संत सद्गुरू गोविंद महाराज यांच्या पावन भूमितील अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह होय. या हरीनाम सप्ताहाच्या पंच कमिटी अध्यक्षपदी उद्योजक समाधान बापू चौधरी तर उपाध्यक्षपदी अनिल लक्ष्मीनारायण मंत्री व वसंत सोनवणे यांची निवड झाली असून, सचिवपदी रवींद्र मोरे व संतोष चौधरी यांची निवड झाली आहे .तर खजिनदारपदी ॲड.जयेश पिलोरे यांची नियुक्ती झाली आहे. भाद्रपद अष्टमी पासून ते पौर्णिमेपर्यंत सतत सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह होतो. त्यात दररोज सकाळी काकडा आरती, दररोज रात्रीचे कीर्तन, शेवटच्या दिवशी भव्य दिव्य असा महाप्रसादाचा कार्यक्रम व सर्वांचा आकर्षण ठरणारा पालखी मिरवणूक सोहळा या कार्यक्रमात होतो. सदर पंच कमिटीची बिनविरोध निवड करण्यात आली असून कासोदेकरांनी व मित्रमंडळींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सावद्यात स्मार्ट मीटर बसविण्यास भा.ज.पा., शिवसेनेचा विरोध

सावदा । प्रतिनिधी

काही दिवसा पासून शहरात सुस्थितीतील मीटर कडून नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम महावितरण कंपनी कडून नियुक्त केलेल्या ठेकेदार कडून राबविली जात आहे. नवीन मीटर बसवताना वीज उपभोक्त्याची कोणतीही परवानगी न घेता किंवा कुठलीही पूर्व सूचना न देता विज उपभोक्त्याकडून चालू मीटर दोषयुक्त आहे सांगून यासह तातूर्मातून कारणे सांगून स्मार्ट मीटर बसवण्याचा धडाका लावलेला आहे.

प्रसंगी अनेक ग्राहकांना खोट्या कारवाईचा धाक दाखवून वीज मीटर बसवले जात आहेत नवीन स्मार्ट मीटरचे बिल पूर्वीच्या मीटर पेक्षा कमी वीज आकारणी बिल आकारणी बिल जास्त येत येत असल्याच्या वाढत्या तक्रारी येत आहेत स्मार्ट मीटर बसवण्याचा ठेका मिळवलेल्या ठेकेदाराची माणसे अनेक नागरिकांकडून खोट्या कारवाईचा धाक दाखवून हजार रुपये उकळत असल्याचे समजते आहे. याबाबत अधिक माहिती घेतली असता दोन दिवसांपूर्वी भाजप सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी ठेकेदाराच्या माणसाला ओले हात करताना पकडले होते वास्तविकता चालू मीटर व स्मार्ट मीटर यातील वीज वापर सारखा यायला हवा मात्र नवीन मीटरचे रीडिंग बऱ्याच पटीने जास्त येत असल्याने उपभोक्त्याची शुद्ध फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनात येत असल्याने निदर्शनात आलेतरी याप्रकरणी संबंधितांनी जातीने लक्ष घालून करवाई करावी यात स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम तत्काळ थांबविण्यात यावी. यापूर्वी ज्या नागरिकांकडे नवीन मीटर बसविले आहे व ज्यांच्या वीजविलाबाबत तक्रारी आहे त्यांच्या तक्रारींचे प्राधान्याने निरसन करून त्यांना योग्य ते वीज बिल देणात यावे. वीज बिलात तफावत असलेले मीटर तत्काळ बदलविण्यात यावे. नागरिकांकडून लाब मागणाऱ्या ठेकेदाराची स्वरित चौकशी करून त्यास दिलेले कंत्राट रद करण्यात यावे. सदरच्या ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्यात येवून यापुढे त्यास कुठलेही कंत्राट देण्यात येवू नये.

याप्रकरणी आपणाकडून त्परित कार्यवाही अपेक्षित आहे. असे न झाल्यास भारतीय जनता पार्टी, शिवसेना महायुती व सावदा शहरातील नागरिक यांच्यातर्फे तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल व होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील यांची नोंद घेण्यात यावी माजी नगराध्यक्ष राजेंद्र चौधरी सुरज परदेशी महेश प्रभाकर अकोलेजे. के. भारंब निलेश खाचणे प्रतिक भावों मनिष भगाळे सौ. देवयानी बेंडाळे लिना संजय चौधरी मंदाकिनी चंद्रकात वारके यांनी सही निशी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.